# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

# जिल्हा पोलीस राजपत्र

## दि - 02.11.2018

# भाग 1 - बदली /नेमणूक /पदोन्नती

## निरंक

# भाग 2 - रजा

क्र. प्रलि/५१-डी/अर्जित रजा-पोनि-गौतम/ 14185 /२०१८ यवतमाळ, दिनांक - 1 NOV 2018

**आदेश**

पोलीस निरीक्षक, अनिलसिंह गौतम, नियंत्रण कक्ष तथा प्र.पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), यवतमाळ यांना वैयक्तिक कारणास्तव बाहेरगांवी जावयाचे असल्याने दिनांक ०५/११/२०१८ ते ०६/११/२०१८ पर्यंत ०२ दिवस अर्जित रजा (रजेच्या आधी दि.०४ व रजेच्या नंतर दि.०७ ते ११/११/१८ च्या शासकीय सुटया जोडून) उपभोगण्याची परवानगी (दि.१७/१०/१८ चे आदेशान्वये ३० दिवस मंजूर अर्जित रजेतून ) मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजूर करण्यात येत आहे. त्यांचे रजा कालावधीत पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), यवतमाळ या पदाचा अतिरिक्त कार्यभार पोनि/प्रकाश शेळके, नियंत्रण कक्ष, यवतमाळ हे पाहतील.

**(पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने )**

**( एस.जी.सिंगारकर )**
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता.

**प्रति,**

१.पोलीस निरीक्षक, अनिलसिंह गौतम, नियंत्रण कक्ष तथा प्र.पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), यवतमाळ
२. पोनि/प्रकाश शेळके, नियंत्रण कक्ष, यवतमाळ.

प्रत-नियंत्रण कक्ष/डिपीजी लिपिक



E:\Nitin\IMP-FOLDERS\LEAVE-2017-18\Leave order-2018\Cएस.म्स 2018एकवबग

2 NOV 2018

क्रमांक :डीपी/३१-बी-२/अनधिकृत गैरहजर/ 14239 /२०१८ यवतमाळ दिनांक

## आ दे श

खालील नमूद पोलीस कर्मचारी कोणत्याही प्रकारची लेखी,तोंडी सुचना न देता नमुद दिनांकाचे कालावधीमध्ये कर्तव्यावरुन अनधिकृतपणे गैरहजर होते. करीता त्यांची गैरहजर कालावधी कसुरी अहवालानुसार असाधारण रजा (बिनपगारी रजा) मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस कर्म.चे नांव व पदनाम | पो.स्टे. / नेमणूक | गैरहजेरीचा कालावधी | आदेश |
|---|---|---|---|---|
| १ | नापोका/३०६ गजानन राठोड | पुसद ग्रा. | दि. १६/०६/२०१८ ते ०१/०८/२०१८ पर्यंत एकुण ४५ दिवस कर्तव्यावरुन अनधिकृत गैरहजर असल्याबाबत. | एकुण **४५ दिवस** असाधारण रजा (बिनपगारी रजा) मंजुर करण्यात येत आहे. |

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

क्रमांक:-सआली-५/५१-डी/अ.रजा/विविध/२०१८ 14179 यवतमाळ दिनांक - 1 NOV 2018

## आदेश

आदेशखालील नमुद पोलीस कर्मचा-यांना त्यांचे नांवासामोर दर्शविल्या कारणास्तव २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरीता ३० व अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे. सदर कर्मचा-यांना कामाची निकड पाहुन आळीपाळीने रजेवर सोडावे व रजेवर सोडल्याची तारीख व वेळ या कार्यालयास कळवावी

| अ.क्र | कर्म.चारी नावव ब. | नेमणुक पो.स्टे. | मंजुर रजा | मंजुरीचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | पोशि/२१२७ निलेश | पो.मुख्या | १५ दिवस | धार्मिक कार्यासाठी |
| २ | पोशि/२३६३ विशाल | खंडाळा | ३० दिवस | घरबांधकाम |
| ३ | मपोशि/२६७९ किरण | वडकी | ३० दिवस | धार्मिक कार्यासाठी |
| ४ | पोाा/२०७९ अविनाश | पांढरकवडा | ३० दिवस | घरबांधकामासाठी |
| ५ | पोशि/२४९४ छंदक | ---//--- | ३० दिवस | धार्मिक कार्यासाठी |
| ६ | पोशि/२३५६ सतिश | पो.मुख्या | ३० दिवस | धार्मिक कार्यासाठी |
| ६ | पोना/२०४३ किशोर | दराटी | ३० दिवस | धार्मिक कार्यासाठी |

(अनिलसिंह गौतम)
प्र.पोलीस उपअधिक्षक,(मुख्या)
यवतमाळ

क्रमांक : पोअय/पशा-२/अर्जित रजा-मंजुर/२०१८ /14205 यवतमाळ, दिनांक : 1 NOV 2018

## आदेश

खालील नमुद लिपीक वर्गीय कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांनी मागणी केलेल्या कारणास्तव अर्जीत रजा मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजुर करण्यात येत आहे.

त्यांचे सदर रजेचे काळात त्यांचे नावासमोर दर्शविलेले लिपीक वर्गीय कर्मचारी हे स्वत:चे पदाचा पदभार सांभाळून त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार पाहतील.

| अ. क्र. | लिपीक वर्गीय कर्मचारी /कार्यालयीन शिपाई यांचे नांव/पदनाम व नेमणुक | रजा मंजुरीचे कारण | रजा कालावधी | अतिरिक्त कार्यभार |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.सुशील मुदावणे कश्रेली | भाच्या लग्ना करिता | दि.२५.११.२०१८ ते ६.११.२०१८ - १३ दिवस | श्री ए.ए.हजारे कश्रेली |
| २ | श्री.सहास सुंकलवार कश्रेली | मुलाला कुत्रा चावल्याने त्याचे उपचारा करिता | दि.२९.१०.०१८ ते ३१..१०.२०१८- ३ दिवस | श्रीमती.एस.ए.राजगडकर कश्रेली |
| ३ | श्रीमती विद्या अढाव कश्रेली | मुलीची तब्येत ठिक नसल्याने | दि.१.११.२०१८ ते ३.११.२०१८-३ दिवस | श्रीमती पुष्पा बटाले कश्रेली |

( मा.पो.अ.यांचे मंजुरीने )

( एस.जी.सिंगारकर )
प्र.कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक यवतमाळ
करीता

-2 NOV 2018

क्र.:डीपी/३१-बी/ बंदोबस्त गै.हजर / 14243 /२०१८ यवतमाळ दिनांक:-

# आदेश

दि. २२/१०/२०१७ रोजी मा. मुख्यमंत्री म.रा.मुंबई यांचा यवतमाळ जिल्हा दौरा कार्यक्रम बंदोबस्त असल्याने खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना दि.२१/१०/२०१७ चे रात्री फोनद्धारे माहीती देण्यात आली होती. तरी सुध्दा दि. २२/१०/२०१७ चे ०८:०० वाजता गणना घेतली असता ते गणनेत गैरहजर होते. त्यामुळे बंदोबस्त पाठवितांना अडचण निर्माण झाली. याबाबत पोलीस मुख्यालय स्टे. डा. साना क्र.१८/१७ दि. २२/१०/२०१७ वेळ ०८.३० वाजता नोंद घेण्यात आली. तरी खालील पोलीस कर्मचारी यांची एक दिवसाची असाधारण रजा (बिनपगारी रजा) मुजंर करण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस कर्मचा-याचे नांव, पदनाम, ब.नं. | नेमणुक |
|---|---|---|
| १) | पोहवा/१४७२ गजानन कडु | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| ०२ | पोशि/२७०२ बालाजी माने | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| ०३ | पोशि/ २७२१ सखाराम पोले | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| ०४ | मपोशि/ २६३१ अरुणा पायलवार | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| ०५ | पोशि/२६४९ पवन ढवळे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| ०६ | पोशि/८९५ विजय गुजर | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| ०७ | मपोशि/ १७६० ज्योती राठोड | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| ०८ | मपोशि/ २५४६ बबीता राठोड | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| ०९ | मपोशि/१२९७ माला वानखडे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| १० | सफौ/९३३ बबन मानकर | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| ११ | पोहवा/८२८ बबन मंदे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| १२ | पोहवा /१८९४ प्रकाश भडके | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| १३ | पोहवा/ ९३ भारत निकुरे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| १४ | पोहवा/१०३६ अर्जुन गेडाम | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| १५ | पोहवा/१३४२ प्रशांत खरात | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| १६ | पोशि/२६३९ बंडु देवकर | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |

| | | |
|---|---|---|
| १७ | पोशि/ ८४ दत्ता केंद्रे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| १८ | पोशि/ २६९७ गोविंद कुमरे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| १९ | पोशि/ १३०० धनराज गव्हाणे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| २० | पोशि/ १३४५ प्रविण वारंजे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| २१ | पोशि/१६८१ गिरजाप्पा मुसळे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| २२ | पोशि/१२७१ राहुल मडावी | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| २३ | पोहवा/५३८ भगवान पवार | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| २४ | पोशि/५०८ नरेश नरवाडे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| २५ | पोना/१७२ विशाल वानखडे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| २६ | पोना /४५९ बळीराम चव्हाण | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| २७ | पोशि/ १३५० सचिन पाखरे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| २८ | पोशि/१४०२ निशांत खडसे | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |
| २९ | पोशि/२४०२ जयकूमार गवळी | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक यवतमाळ

14230

क्र : पोअय/प्रलि/५१-डी/रोखीकरण-सन-२०१८-१९/पो.अधिकारी/ /२०१८ यवतमाळ, दिनांक :- 1 NOV 2018

## आदेश

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र : एलव्हीई-२००२/प्र.क्र.५६४/पोल-५ (ब), दि.२७-०२-२००४ अन्वये पोलीस दलातील पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक दर्जापर्यंतच्या अधिका-यांना एका वित्तिय वर्षात १५ दिवस अर्जित रजा प्रत्यार्पण करण्यास शासनाने मंजुरी प्रदान केलेली आहे.

सदर शासन निर्णयातील तरतुदीस अनुसरुन खालील पोलीस अधिकारी यांना वित्तीय वर्ष-२०१८-१९ करीता शासकीय नियमानूसार १५ दिवस अर्जित रजा प्रत्यार्पित करण्यांस मंजुरी प्रदान करण्यांत येत आहे.

| अ.क्र | पोलीस अधिकारी यांचे नाव | नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | पोनि/संजय भुजंगराव चोबे | पोस्टे.पुसद ग्रामिण |
| २. | सपोनि/सचिन किसनराव लुले | पोस्टे.पुसद शहर |
| ३. | सपोनि/आशिष सुरेश इंगळे | पोस्टे.वसंतनगर |
| ४. | सपोनि/संघरक्षक नामदेव भगत | पोस्टे.यवतमाळ शहर |
| ५. | सपोनि/रविंद्र कृष्णा भंडारे | पोस्टे.वसंतनगर |
| ६. | सपोनि/संदिप ऊत्तमराव एकाडे | पोस्टे.दारव्हा |
| ७. | सपोनि/विशाल मुरलिधर खलसे | पोस्टे.आर्णी |
| ८. | पोउपनि/सचिन राजपाल चौहान | पोस्टे.पुसद ग्रा. |
| ९. | पोउपनि/नितीन वामनराव बलीगवार | पोस्टे.मारेगांव |
| १०. | पोउपनि/राहुल सत्यपाल किटे | पोस्टे.पांढरकवडा |
| ११. | पोउपनि/वनदेव नामदेव कापडे | पोस्टे.दिग्रस |
| १२. | पोउपनि/बालाजी गोविंदराव महाजन | पोस्टे.दारव्हा |
| १३. | परि.पोउपनि/राजेश केशवराव पुरी | पोस्टे.घाटंजी |
| १४. | परि.पोउपनि/महेश फुलचंद घुगे | पो.स्टे.दिग्रस |
| १५. | परि.पोउपनि/आकाश बबनराव महल्ले | पो.स्टे.अवधुतवाडी |
| १६. | परि.पोउपनि/प्रताप विजय बाजड | पोस्टे.दारव्हा |
| १७. | परि.पोउपनि/संतोष रामभाऊ जायेभाये | पोस्टे.लोहारा |

प्रमाणित करण्यांत येते की, वरील अधिका-यांना यापुर्वी अर्जित रजा प्रत्यार्पित करण्यांस मंजुरी प्रदान करण्यांत आलेली नाही तसेच वरील मंजुर रजेची नोंद त्यांचे सेवापुस्तकात घेण्यांत आलेली आहे.

वरील रजा प्रत्यार्पित करण्यांस येणारा खर्च सन २०१८-२०१९ या वित्तिय वर्षाकरीता २०५५-पोलीस-१०९-जिल्हा पोलीस (००)(०१)-जिल्हा पोलीस दल-वेतन या लेखाशिर्षाखालील मंजुर अनुदानातुन भागविण्यांत येईल.

(एम. राज कुमार)
पोलीस अधीक्षक,यवतमाळ.

# भाग 4 - बक्षिस / मानधन

निरंक

# भाग 5-शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

-2 NOV 2018

क्र.:डीपी/३१-बी -२ /१६०९ गिरनाळे /अंआ/ 14237 /२०१८ यवतमाळ दिनांक

## अंतीम आदेश

कसूरदार :- **नापोका/१६०९ गिरनाळे पो.मुख्यालय, यवतमाळ**

कसूरी :-

आपणास शिवसेना मोर्चा बंदोबस्त असल्याने पोलीस मुख्यालय यवतमाळ येथुन सिआरओ येथे हजर होणे करीता कळविले असता आपण दि. ०१.०८.२०१८ चे २३.०० वा. ते ०२.०८.२०१८ चे ०८.०० वा. पावेतो कर्तव्यावर गैरहजर आढळुण आले.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेला हलगर्जीपणा व गैरहजेरीबाबत आपणास क्र.डीपी/३१-बी/१६०९ गिरनाळे/कसुरी/१०७७०/२०१८ यवतमाळ दि. ३/९/२०१८ नुसार **'रु.२०००/-'आर्थिक दंड** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटिस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **नापोका/१६०९ गिरनाळे** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **'रु.२०००/-'आर्थिक दंड** ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत विशेष पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

( एम.राज कुमार )
पोलीस अधीक्षक यवतमाळ

- 2 NOV 2018

क्र.:डीपी/३१-बी -२ / २६४६ राठोड/कसुरी/अंआ/ 14236 /२०१८ यवतमाळ दिनांक

# अंतीम आदेश

**कसूरदार :-** **पोशि/२६४६ विलास राठोड पो.मुख्यालय,यवतमाळ.**

**कसूरी :-**

आपण दि.१०.०३.२०१८ रोजी एक दिवस किरकोळ रजा व दि.११.०३.२०१८ रोजी साप्ताहीक रजेवर रवाना झाले. त्यांना SLR Rifle व १० प्लास्टीक काडतुस सहकारी कर्मचारी यांचे ताब्यात देण्याबाबत वरीष्ठांनी सुचित केले असतांना सुध्दा त्यांनी तसे न करता परस्पर रजेवर सोबत घेवुन गेले. तसेच दि.१२.०३.२०१८ ते १७.०३.२०१८ पर्यंत कर्तव्यावर अनधिकृतपणे गैरहजर राहीले. आपण नेहमी गैरहजर राहण्याचे सवयीचे आहेत.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेला हलगर्जीपणा व गैरहजेरीबाबत कसुरीकरीता आपणास क्र.डीपी/३१-बी/२६४६ राठोड/कसुरी/८६५५/२०१८ यवतमाळ दि. २८/६/२०१८ नुसार **'एक महीन्याचे मुळ वेतनाइतका'आर्थिक दंड** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **पोशि/२६४६ विलास राठोड** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **'एक महीन्याचे मुळ वेतनाइतका'आर्थिक दंड** ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत विशेष पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

( एम.राज कुमार )
पोलीस अधीक्षक यवतमाळ

क्रमांकः- डिपी/३१ बी/प्रा.चौ./नापोशि-१३५६ शेख /अ.आ / 14217 /२०१८ यवतमाळ दिनांक 2 NOV 2018

# अंतिम आदेश

**अपचा-यांचे नांव :-** नापोशि /१३५६ शे.नईम शे.मसुद तत्का.नेमणुक पो.स्टे.वडकी सलग्न पो.मु.यवतमाळ.

**कसूरीचे स्वरुप :-**

आपण नापोशि /१३६५.नईम शे.मसुद पो.स्टे.वडकी येथे नेमणुकीस असतांना दि. २३/१०/२०१६, ०३/११/२०१६, ०६/११/२०१६, ०७/११/२०१६, ०९/११/२०१६, १०/११/२०१६ रोजी पो.स्टे. वडकी येथे गैरहजर होते. नमुद गैरहजेरीचे कालावधीत पो.स्टे.वडकी येथे मुख्यालयी हजर न राहाता गैरहजर कालावधीत पो.स्टे.वणी शहरात राहुन दि.२७/११/२०१६ रोजी होणा-या वणी नगर परिषद निवडणुक मध्ये AIMI M राजकिय पक्षाचे उमेदवारा सोबत वणी शहरात फिरुन निवडणुक संदर्भात प्रचार केले असल्याचे प्राप्त गोपनिय अहवालावरुन केलेल्या चौकशीत दिसुन आले आहे. आपण शिस्तिचे पोलीस दलात कार्यरत असतानां नेमलेल्या मुख्यालयी हजर न राहता वेळोवेळी गैरहजर राहुन वणी येथे नगर परिषद निवडणुक दरम्यान वणी शहरात जाऊन AIMI M या राजकिय पक्षाचा प्रचार करुन शिस्तप्रिय पोलीस खात्याच्या शिस्तिचे उलंघन करुन कसुरी केलेली आहे.

उपरोक्त कर्तव्यातील कसुरी प्रकरणी प्राथमिक चौकशी आदेशीत करण्यात येवुन प्राथमिक चौकशी मध्ये आपण नेमलेल्या मुख्यालयी गैरहजर राहुन AIMI M या राजकिय पक्षाचा प्रचार आणि प्रसार केले असल्याचे दिसुन आले. आपले उपरोक्त कसुरी प्रकरणी **पुढील देय वार्षीक वेतनवाढ तीन (३) वर्षाकरिता** (परिणामकारक) **स्थगीतीची शिक्षा का करण्यात येवु नये ? म्हणुन कादानो देण्यात** आली. सदर कादानो नोटीस स्विकारुण त्यावर स्पष्टीकरण सादर केले आहे.प्राप्त स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता.तेः समाधान कारक नाही. केलेल्या प्रार्थमिक चौकशीत आपल्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप पुर्णता सिध्द झाले आहे. प्रस्तावित शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अतिंम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे नापोशि /१३५६ शे.नईम शे.मसुद यांना उपरोक्त कसूरी प्रकरणी मुंबई पोलीस नियम (शिक्षा व अपिल ) १९५६मधिल नियम (३) (२) (v) मधील तरतूदीनुसार **पुढील वेतनवाढ तिन (३) वर्षा करिता (परिणामकारक ) स्थगितीची शिक्षा देण्यात येत आहे.** सदर शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा वगळून व नैमत्तीक रजा सोडून अमंलात येईल.

अपचारी हे जर सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर ते आदेश मिळाल्याचे दिनांकापासून ६० दिवसांचे आंत विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

**(एम. राज कुमार)**
**पोलीस अधिक्षक,यवतमाळ.**

क्रमांक:डीपी/३१-बी/सफौ-९२ गौरखेडे /निलंबन/ 14231 /२०१८ यवतमाळ दिनांक - 1 NOV 2018

## निलंबन आदेश

आपण सफौ-९२ रविंद्र लक्ष्मणराव गौरखेडे पो.स्टे. पारवा दुरक्षेत्र- सावळी सदोबा येथे इंचार्ज म्हणुन कार्यरत असुन मिळालेल्या गोपनिय माहीतीवरुन आपण नेमलेल्या क्षेत्रात मटकेवाल्यापासुन मोठी रक्कम घेवुन मटका चालविता व मटकेवाल्यांना रेड पडत असल्यास त्याबाबतची माहीती पुरवितात. मटकेवाल्यापासुन पैसे घेतांना सावळी येथील लोकांनी पाठविलेल्या VDO चित्रीकरण व्दारे दिसुन आले आहे. तसेच इतर लोकांसोबत अरेरावीची भाषा वापरतात. आपले कृत्य हे सचोटी , संशयास्पद असुन जनमानसात पोलीस खाल्याची प्रतिमा मलीन करणारे व शिस्तप्रीय खात्याला न शोभनारे आहे. ही बाब पोलीस खात्यास अशोभनीय असुन गैरवर्तणुकी बाबत मला प्राप्त अधिकारान्वये चौकशीचे अधिन आदेश दिनांक पासुन तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात येत आहे.

२ निलंबन काळात आपले मुख्यालय, पोलीस मुख्यालय यवतमाळ हे निश्चीत करण्यात येत आहे. आपले निलंबन काळात आपण पोलीस उपअधिक्षक मुख्यालय यवतमाळ हयांचे पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडु नये. या निश्चीत केलेल्या मुख्यालयात आपण दररोज न चुकता हजेरी द्यावी.

३. निलंबन काळात आपणांस निर्वाह भत्ता अस्तीत्वात असलेल्या नियमाप्रमाणे देण्यात येईल. आपण दर महिन्याला निर्वाह भत्ता घेण्यापुर्वी अगोदरच्या महिन्यात (ज्या महिन्याचा त्यांना निर्वाह भत्ता घ्यावयाचा आहे तो महिना) आपण कोणतीही खाजगी नोकरी अथवा कोणताही खाजगी व्यवसाय/ उद्योग केलेला नाही त्याबद्दलचे प्रमाणपत्र द्यावे लागेल.

४. आपणांस असेही सुचीत करण्यात येते की, निलंबन काळातही आपण पोलीस कर्मचारी म्हणुन राहाल निलंबित नसतांना जी जबाबदारी शिस्त व शिक्षा आपणांस लागु होत्या त्याच त्यानां आताही लागु राहतील. फक्त आपले अधिकार कार्य व विशेष सुविधा निलंबन काळात तात्पुरते तहकुब राहतील.

५. पुढे आपणांस असेही सुचीत करण्यात येते की, निलंबन काळात कोणतीही खाजगी नोकरी अथवा व्यवसाय/ उद्योग करण्याची आपणांस परवानगी नाही. जर आपण आपले निलंबन काळात खाजगी नोकरी अथवा खाजगी व्यवसाय/उद्योग केला तर ही गैरवर्तणुक ठरेल व त्याबद्दल आपले विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकरणात आपला निर्वाह भत्त्यावर अधिकार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

( एम.राज कुमार )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

2 NOV 2018

क्र.:डीपी/३१-बी -२ / ११२२डोईजड/अंआ/ 14235 /२०१८ यवतमाळ दिनांक

## <u>अंतीम आदेश</u>

**<u>कसूरदार</u> :-** **पोना/११२२ संजय डोईजड पो.स्टे.पांढरकवडा संलग्न मो.परी.वि.यवतमाळ**

**<u>कसूरी</u> :-**

आपण पो.स्टे. पांढरकवडा येथे चालक म्हणुन कार्यरत आहात. दि.०८.०९.२०१७ रोजी पो.उप नि.अशोक चरडे हे १४.०० ते २०.०० वाजता पावेतो ड्युटी ऑफिसर म्हणुन ड्युटीवर असतांना, पो.नि.खान यांनी मौजा पहापळ येथे जुगार रेड करीता पोलीस स्टाफसह जाणेबाबत आदेश दिल्याने जिप क्र.एमएच २९ एम ९५१७ चे चालक आपणांस 'ड्रायव्हर रेड करीता चला' असे म्हटले असता मला ड्रायव्हर का म्हटले असे म्हणुन वाद केला. वादाबाबतचा राग पांढरकवडा ते मौजा पहापळ येथे जातांना सरकारी जिप वेगाने चालवुन राग व्यक्त केला. तसेच यापुर्वी दि.२८.०८.२०१७ रोजी मौजा मोहदा येथे प्रोव्ही. रेडला जात असतांना आपण सरकारी गाडीमध्ये बसले असतांना राग सरकारी गाडीवर काढुन वाहन वेगाने व धोकादायक रीतीने चालवित होते. याबाबत वाहनात बसलेले पो.उप नि. मांजरमे व सोबत असलेले कर्मचारी यांनी टोकले असता आपण गाडीचा वेग कमी केला. तरी आपण वरीष्ठ अधिकारी यांचेसोबत उध्दट वागणुक देवुन असभ्य वर्तन केले आहे. आपल्या वर्तणुकीमुळे शासकिय वाहनाचा अपघात होवुन सरकारी वाहनातील कर्मचारी यांचे जिवीत हानी व सरकारी वाहनाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आपण आपल्या कर्तव्याची जाण न ठेवता चुकीची पध्दत अवलंबुन राग व्यक्त केल्याचे निष्पन्न होते. आपली वर्तणुक शिस्तप्रिय पोलीस खात्यास अशोभनिय आहे.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेला ~~हलगर्जीपणा व गैरहजेरीबाबत~~ कसुरीकरीता आपणास क्र.डीपी/३१-बी/११२२ डोईजड/११२८/२०१८ यवतमाळ दि. ३१/१/२०१८ नुसार **'रु.२०००/-'**आर्थिक दंड या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही.

## <u>आदेश</u>

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **पोना/११२२ संजय डोईजड** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **'रु.२०००/-'आर्थिक दंड** ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत विशेष पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

( एम.राज कुमार )

**पोलीस अधीक्षक यवतमाळ**

-2 NOV 2018

क्र.:डीपी/३१-बी -२ /६१२ पवार/अंआ/ 14253. /२०१८ यवतमाळ दिनांक

## अंतीम आदेश

**कसूरदार :-** **पोना/६१२ शिवराज पवार पो.स्टे.महागाव**

**कसूरी :-**

पो.स्टेमहागांव येथे दि.१०.०६.२०१७ रोजी अपराध क्र.३८७/२०१७ कलम ३०२ भादवी प्रमाणे अज्ञात व्यक्ति विरुध्द गुन्हा नोंद आहे. उपविभागीय अधिकारी यांनी कागदपत्राची पाहणी केली असता, मृतक श्रावण हनवते रा.अनंतवाडी हा त्याचे कवछा शिवारातील शेतात रात्री जागलीला गेला असता त्याला कोणीतरी अज्ञात इसमाने डोक्यात कशानेतरी मारुन गंभीर जखमी केले अशी माहिती पोलीस पाटील श्री.भारती यांनी दि.१३.०५.२०१७ रोजी पो.स्टेला फोनव्दारे दिली. स्टेडायरी साना क्र.३४/१७ चे १८.२९ वाजता पोना/६१२ शिवराज पवार यांनी नोंद घेतली आहे. याबाबत ठाणेदार यांना माहिती देण्यात आल्याची नोंद घेण्यात आली आहे. दि.१४.०५.२०१७ रोजी उशीराने पोना/६१२ यांनी घटनास्थळ पंचनामा १४.३० वाजता सुरु करुन १५/१५ वाजता संपविला आहे. पंचनामा अतिशय मोघम स्वरुपाचा असुन घटनास्थळावरील वस्तु जप्त केल्याचे पंचनाम्यामध्ये नोंद करण्यात आली नाही. उपचारादरम्यान दि.०७.०६.२०१७ रोजी श्रावण हनवते मरण पावला. याबाबत उपविभागीय कार्यालयाव्दारे जावक क्र.१९२०/२०१७ दि.१०.०७.२०१७ अन्वये खुलासा मागविण्यात आला असता सादर करण्यात आलेला नाही.

आपण बिटजमादार असुन जाणीवपुर्वक गुन्हा नोंद कार्यवाही करण्यास कसुरी केल्याचे सकृत दर्शनी दिसुन येत आहे.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेला हलगर्जीपणा व कसुरीकरीता आपणास क्र.डीपी/३१-बी/पोना ६१२ पवार/कादानो/११७४५/२०१७ यवतमाळ दि. २४/९/२०१७ नुसार **'एक वर्ष वेतनवाढ स्थगीती'** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटिस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **पोना/६१२ शिवराज पवार** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **'एक वर्ष वेतनवाढ स्थगीती'** (अपरीणामकारक) ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत विशेष पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

( एम.राज कुमार )
**पोलीस अधीक्षक यवतमाळ**

क्र.:डीपी/३१-बी -२ /१३६७ सुरपाम /अंआ/ 14250 /२०१८ यवतमाळ दिनांक 2 NOV 2018

# अंतीम आदेश

**कसूरदार :-** **सफौ/१३६७ कैलास सुरपाम पो.स्टे.लोहारा**

**कसूरी :-**

पो.स्टे. लोहारा हद्यीत दि.३०/०१/२०१८ रोजी शिवाजी नगर लोहारा मंध्ये विनापरवाना अवैद्य दारु व मोहमाचा सडवा असे एकुण रुपये १४५००/- चा मुद्देमाल मिळुन आला. प्रकरणी पो.स्टे.ला गुन्हा नोंद आहे. सदरचा छापा मारल्यानंतर गुन्हयाचा तपास लागलीच आपल्याक्रडे देण्यात आला होता. पुढील कार्यवाही करण्याचा आदेश देण्यात आला. आपण गुन्हयासबंधाने शासकीय पंचासमक्ष सदर मॉडेल केसचा मोका पंचनामा करुन गुन्हयातील मुद्देमाल मोक्यावर सिलबंद करुन सॅम्पल तात्काळ त्याच दिवशी रासायनीक परीक्षणाकरीता अमरावती येथे स्पेशल पो.शि.मार्फत रवाना करणे आवश्यक असतांना मुद्देमाल हेडमोहरर यांचेकडे जमा करावा असा आदेश वरीष्ठांनी दिला होता. परंतु आपण वरीष्ठांचे आदेशाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन दि.१५/०२/२०१८ पावेतो सी.ए. तपासणीकरीता हेडमोहरर कडे दाखल केले नाही. दोन तिनदा तोंडी आदेश देवुन सुध्दा जाणीवपुर्वक वरीष्ठांचे आदेशाचे पालन न करता निष्काळजीपणा केला आहे.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेला हलगर्जीपणा व कसुरीबाबत आपणास क्र.डीपी/३१-बी/२/१३६७-कादानो/३००६/२०१८ यवतमाळ दि. ०६/३/२०१८ नुसार **'एक महीन्याचे मुळ वेतनाईतका'आर्थिक दंड** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **सफौ/१३६७ कैलास सुरपाम** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **'एक महीन्याचे मुळ वेतनाईतका'आर्थिक दंड** ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत विशेष पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

( एम.राज कुमार )
पोलीस अधीक्षक यवतमाळ

-2 NOV 2018

क्र.:डीपी/३१-बी -२ /१६०९ गिरनाळे /अंआ/ 14208 /२०१८ यवतमाळ दिनांक

## अंतीम आदेश

**कसूरदार :- नापोका/१६०९ साहेबराव गिरनाळे पो.मुख्यालय, यवतमाळ**

**कसूरी :-**

दि.२६.१२.२०१७ रोजी आपली येथुन सकाळी ०९.०० वाजता वि.पुसद शेषन कोर्ट, वि.जे.एम.एफ.सी. कोर्ट पुसद यांचे कोर्टाचे खाली वारंटची तारीख वाढवुन आणनेबाबत ड्युटी लावण्यात आली. आपणांस यवतमाळ जेल येथुन एकुण ९ खाली वारंट तारीख वाढवुन आनण्याकरीता पुसद येथे गेले होते. परंतु दि.१८.१२.२०१७ पर्यंत आपण वारंट जेलमध्ये दाखल केले नाही. दि.१७.१२.२०१७ रोजी पो.नि.पो.स्टे.पुसद शहर यांनी त्यांचे बिनतारी संदेश नुसार पोशि/५१६ गजभार यांना बसस्टँड परीसरात सरकारी टोपी सापडली असुन त्या टोपीमध्ये आरोपीचे खाली जेल वारंट मिळाले आहे. सदर वारंट घेवुन जाणेकरीता एक कर्मचारी पोहवा/१३४२ प्रशांत खरात यांना पाठविण्यात आले. तसेच वारंट कारागृहामध्ये पोहवा खरात यांनी दि.२०.१२.२०१७ रोजी दाखल करण्यात आले. तरी आपण सरकारी दस्तऐवज जबाबदारीने न सांभाळता निष्काळजीपणे हरविले आहे.

आपल्या कर्तव्यात गंभीर बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा करुन जाणुन बुजुन कर्तव्यात कसुरी केल्याचे दिसुन येते. आपण आपल्या कर्तव्याप्रती प्रामाणीक व सतर्क न राहता अक्षम्य कसुरी केली आहे. आपली वर्तणुक शिस्तप्रिय पोलीस खात्यास अशोभनिय आहे. तरी उपरोक्त कसुरीकरीता आपणांस क्र.डीपी/३१-बी/१६०९ गिरनाळे/१४३८/२०१८ यवतमाळ दि. ८/२/२०१८ नुसार **'एक महिन्याचे मुळ वेतनाइतका'आर्थिक दंड** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **नापोका/१६०९ साहेबराव गिरनाळे** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **'एक महिन्याचे मुळ वेतनाइतका'आर्थिक दंड** ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत विशेष पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

**( एम.राज कुमार )**
**पोलीस अधीक्षक यवतमाळ**

- 2 NOV 2018

क्र.:डीपी/३१-बी -२ /सपोनि-पिदुरकर /अंआ/ 14242 /२०१८ यवतमाळ दिनांक

## अंतीम आदेश

**कसूरदार :- सपोनि/ आनंद पिदुरकर, नेमणुक पो.स्टे. पांढरकवडा**

**कसूरी :-**

आपणाकडे तपासावर असलेल्या गुन्हयाची दि.२३/०८/२०१७ रोजी वरीष्ठांनी दप्तर निरीक्षण केले असता अप.क्र.३९/१७ कलम ३७९ भादवि चे गुन्हयात ट्रक चोरीस गेला असुन फक्त तपासामंध्ये घटनास्थळ पंचनामा कार्यवाही व्यतिरीक्त कोणताही तपास केला नाही.

अप.क्र.२६१/१७ कलम ३२४,१४३,१४७,५०४,५०६ भादविचा गुन्हयाचे दोषारोप पत्र तयार करुन पडताळणीकरीता पो.स्टे. जावक क्र. २४१२/१७ दि.१३/१०/२०१७ अन्वये सादर केला असता गुन्हा हिंदु मुस्लीम मधील असल्याने गुन्हयात फक्त दोन आरोपींना अटक केले उर्वरीत तिन आरोपी निष्पन्न करुन त्यांना अटक केली नाही. व वापरलेले शस्त्र व मोटरसायकल जप्त केले नाही. साक्षीदार यांचे बयान नोंदविले नाही, फिर्यादिचे बयान नोंदविले नाही. कोणताही पुरावा हस्तगत केला नाही.

दि.२७/१०/२०१७ चे वरीष्ठांचे आकस्मीत भेटीदरम्यान पो.स्टे. पांढरकवडा येथे आपले दप्तर निरीक्षन केले असता व प्रलंबीत गुन्हे निर्गतीबाबत देण्यात आलेल्या सुचनांकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्याचे आढळुन आले असल्याने खुलासा मागविण्यात आला असता सादर करण्यात आला नाही. तसेच अप.क्र.२९१/१७ कलम २७९,३०४ (अ.) भादविचे गुन्हयाचे DAR,AA फॉर्म मा.पो.म.स.म.रा.मुंबई यांचे वेबसाईडवर अपलोड करणेबाबत सुचना देवुन अपलोड केलेला नाही. आपण वारंवार कर्तव्यात कसु री करत असल्याचे दिसुन येते.

तरी उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेला हलगर्जीपणा व कसुरीबाबत आपणांस **' दोन वर्ष वेतनवाढ स्थगीती ' (परीणामकारक)** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **सपोनि/ आनंद पिदुरकर** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **' दोन वर्ष वेतनवाढ स्थगीती ' (परीणामकारक)** ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत विशेष पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

**( एम.राज कुमार )**
**पोलीस अधीक्षक यवतमाळ**

क्र.:डीपी/३१-बी -२ /१११११ बोंडे /अंआ/ 14225 /२०१८ यवतमाळ दिनांक - 2 NOV 2018

# अंतीम आदेश

**कसूरदार :-** **पोना/११११ राजु बोंडे पो.मु.,यवतमाळ**

**कसूरी :-**

अपराध क्र.२२/१७ कलम ३९७ भादवी. शासन विरुध्द शंकर+३ मध्ये यवतमाळ जिल्हा कारागृहातील चार न्यायाधिन बंद्यांचे मा.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी भद्रावती जि.चंद्रपुर येथे दि.०५.०७.२०१८ रोजी खाली वारंट आपल्या मार्फत पाठविण्यात आले होते.

परंतु आपण दि.०६.०७.२०१८ रोजी तिन दिवस उशीराने दाखल केले तसेच सदर आरोपींची पुढील पेशिची तारीखही दि.०९.०७.२०१८ ही देण्यात आली होती. असे अधिक्षक, यवतमाळ जिल्हा कारागृह यांनी कळविले आहे.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेला हलगर्जीपणा व कसुरीकरीता आपणास क्र.डीपी/३१-बी/पोना ११११बोंडे/वारंट कसुरी/९६१७/२०१८यवतमाळ दि. २४/७/२०१८ नुसार **'रु ५०००/-'आर्थिक दंड** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **पोना/११११ राजु बोंडे** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **'रु.५०००/-'आर्थिक दंड** ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत विशेष पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

**( एम.राज कुमार )**
**पोलीस अधीक्षक यवतमाळ**

-2 NOV 2018

क्र.:डीपी/३१-बी -२ / १२४ गिरी/कसुरी/अंआ/ 15227/२०१८ यवतमाळ दिनांक

## अंतीम आदेश

**कसूरदार :-** **पोहवा/१२४ मनोज गिरी पो.स्टे.राळेगाव**

**कसूरी :-**

आपण पोहवा/१२४ मनोज गिरी पोलीस स्टेशन राळेगांव परिसरातील बिट अंमलदार म्हणुन कामकाज करीत असतांना बिट क्षेत्रात दारुबंदी कायद्या अंतर्गत गुन्हे नोंद करुन मुद्येमाल हस्तगत केला. आपण आपले कडील नमुद प्रकरणातील सि.ए. सॅम्पल हेडमोहरर यांचे कडे दाखल न करता खालील प्रमाणे स्वत:कडे प्रलंबीत ठेवले.

| अ. क्र | अप क्र. / कलम | दाखल ता. वेळ | सि.ए. सॅम्पल हेडमोहरर कडे दाखल केल्याची तारीख | प्रलंबीत दिवस |
|---|---|---|---|---|
| १. | १७८/१७ क. ६५ ड मदाका | १४.०५.२०१७ | ३१.१२.२०१७ | ०७ महिने |
| २. | २०५/१७ क. ६५ ड मदाका | २१.०६.२०१७ | ३१.१२.२०१७ | ०६ महिने |
| ३. | ५०६/१७ क. ६५ ई मदाका | २३.०६.२०१८ | ३१.१२.२०१७ | ०६ महिने |
| ४. | २३१/१७ क. ६५ ड मदाका | २२.०७.२०१७ | ३१.१२.२०१७ | ०५ महिने |
| ५. | २३८/१७ क. ६५ ड मदाका | २२.०७.२०१७ | ३१.१२.२०१७ | ०५ महिने |
| ६. | २४१/१७ क. ६५ ड मदाका | २३.०७.२०१७ | ३१.१२.२०१७ | ०५ महिने |
| ७. | २६०/१७ क. ६५ ड मदाका | १५.०८.२०१७ | ३१.१२.२०१७ | ०४ महिने |
| ८. | ३०७/१७ क. ६५ ड मदाका | ३०.०९.२०१७ | ३१.१२.२०१७ | ०३ महिने |
| ९. | ३२३/१७ क. ६५ ड मदाका | २०.१०.२०१७ | ३१.१२.२०१७ | ०२ महिने |

गुन्ह्यातील सि.ए. सॅम्पल एक महिन्याचे वर विनाकारण प्रलंबीत ठेवले असता उपविपोअ कार्यालया अंतर्गत आपणास पत्र क्रमांक वाफौ/५-फ/६३३/२०१८ दिनांक ०२.०३.२०१८ अन्वये कारणे दाखवा नाटिस बजावण्यात आलेली होती. परंतु त्या बाबत आपण स्पष्टीकरण सादर केलेला नाही. पोलीस निरीक्षण यांनी आपणास वारंवार आपले कडील प्रलंबीत गुन्हे यांचा निपटारा करणे बाबत सुचना दिल्या. परंतु त्याचेकडे दर्लक्ष करुन सि.ए. सॅम्पल विनाकारण प्रलंबित ठेवले आहे.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेला हलगर्जीपणा व निष्काळजीपणाबाबत केलेल्या कसुरीकरीता आपणास क्र.डीपी/३१-बी-२/१२४ गिरी/कसुरी/१२५१९/२०१८ यवतमाळ दि. २४/०९/२०१८ नुसार **'दोन (२) वर्ष वेतनवाढ स्थगिती '(परीणामकारक)** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले. स्पष्टीकरण समाधानकारक नाही. तरी ही सुधारण्याची शेवटीची

संधी देवुन व शिक्षा कमी करुन प्रस्तावित कादानो मध्ये अंशतः बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **पोहवा/१२४ मनोज गिरी** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **'एक महीन्याचे मुळ वेतनाइतका '**आर्थिक दंडची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत पोलीस उप महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

( एम.राज कुमार )
पोलीस अधीक्षक यवतमाळ

---

क्रमांक :डीपी/३१-बी-२/स.ताकीद/ 14228 /२०१८ यवतमाळ दिनांक 2 NOV 2018

## आ दे श

दि.२८/०९/२०१८ रोजी पोनि /शिरभाते यांनी जिल्हा गस्त अधिकारी म्हणुन पोलीस स्टेशन नेर येथे भेट दिली असता आपण कर्तव्यावर साध्या गणवेशामध्ये हजर असल्याचे दिसुन आले. यापुढे कर्तव्य बजावत असतांना पोलीस गणवेशामध्ये कर्तव्यात हजर राहावे.उपरोक्त कसुरीबाबत आपणास **'सक्त ताकीद'** देण्यात येत आहे.यापुढे अशी चुक होणार नाही याबाबत नोंद घ्यावी.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक यवतमाळ

# भाग 6 - प्रशिक्षण व इतर

# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

जा.क्र.पोअय/आस्था–प्रशि/BDDS REF/14242/१८
पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय,
यवतमाळ. दिनांक : ०१/११/२०१८

2 NOV 2018

**आदेश :–**

महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकेडमी ,एस आर पी एफ ग्रुप ०१ रामटेकडी,हडपसर पुणे येथे दिनांक १२.११.२०१८ ते १४.११.२०१८ या कालावधीत आयोजित बीडीडीएस रिफ्रेशर कोर्सकरीता खालील नमुद पो. कर्मचारी यांची निवड करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचाऱ्यांची नावे | नेमणुक | प्रकार |
|---|---|---|---|
| ०१ | पोना/३३१, मनोज मुळे | बीडीडीएस पथक, यवतमाळ | निवड |
| ०२ | पोशि/१३५७, अरूण तायडे | बीडीडीएस पथक, यवतमाळ | राखीव |

सदर प्रशिक्षणास जाणेस टाळाटाळ केल्यास संबंधितांविरुध्द गंभीर दखल घेतली जाईल. अपवादात्मक परिस्थितीत संबंधीत प्रभारी अधिकारी यांनी राखीव पो. कर्म. प्रशिक्षणास रवाना करून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर प्रशिक्षणास पो. कर्म. न पाठविल्यास संबंधीतास जंबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी .

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( अनिलसिंह गौतम )
प्र. पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

जा.क्र.पोअय/आस्था–प्रशि/प्र.शुल्क/ 14245 /१८
पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय,
यवतमाळ. दिनांक : ०१/११/२०१८
- 2 NOV 2018

पान क्र. (१)

**आदेश :—**

खालील पोलीस कर्मचा-यांनी त्यांचे प्रशिक्षणाकरीता निवड झाली असतांना त्यांनी स्वतः त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे प्रशिक्षण शुल्क भरणा केला आहे. सदरचा खर्च रु. २६,६२१/- बाब क्र.२८ व्यावसायिक सेवा व विशेष सेवा प्रदाने या शिर्षाखाली मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | प्रशिक्षणाचे नाव | प्रशिक्षण कालावधी | प्रशिक्षणार्थ्याचे नाव | प्रशि. शुल्क |
|---|---|---|---|---|
| १ | अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा व महिला अत्याचारासंबंधी गुन्हे तपास | दि.०४.१२.१७-०९.१२.१७ | मपोशि/५३४, शिवानी मारोती शिंदे | ११०० + ७८० |
| २ | न्याय सहायक विज्ञान व न्यायवैद्यक शास्त्र व पो तपास | २५.१२.१७-३०.१२.१७ | मपोशि/५३४, शिवानी मारोती शिंदे | ८९० + ७८० |
| ३ | सायबर गुन्हयांचा तपास व डिजीटल पुरावा हाताळणे | १८.१२.१७-२३.१२.१७ | मपोशि/५३४, शिवानी मारोती शिंदे | १०१५ + ७८० |
| ४ | गुन्हे दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याचे प्रशिक्षण | ३०.०४.१८-१२.०५.१८ | मपोना/१९६६, स्वाती माणिकराव शिंगाडे | १६९० + १०६६ |
| ५ | घटनास्थळाचा तपास व मनुष्यवध प्रकरणांचा तपास | ०३.०९.१८-०८.०९.१८ | पोशि/ २६५१ विकास खंडारे | ९८० + ७८० |
| ६ | गुन्हे दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याचे प्रशिक्षण | ०२.०७.१८-१४.०७.१८ | पोशि/२६६५ जगदीश तुकाराम चव्हाण | १६९० + १०६६ |
| ७ | गुन्हे दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याचे प्रशिक्षण | ०२.०७.१८-१४.०७.१८ | पोना/१९९४ अमोल पांडुरंग सातपुते | १६९० + १०६६ |
| ८ | सायबर गुन्हयांचा तपास व डिजीटल पुरावा हाताळणे | २१.०६.१८-२६.०६.१८ | पोना/१९९८ निलेश मदन चंदन | १०६६ + ७८० |
| ९ | न्याय सहायक विज्ञान व न्यायवैद्यक शास्त्र व पो तपास | ०७.०६.१८-१२.०६.१८ | पोना/१८०८, संदीप हरीदास सलामे | ९५३ + ७८० |
| १० | सायबर सेल व मोबाईल फॉरेन्सीक सायन्स | २१.०५.१८-२६.०५.१८ | मपोशि/२६३०, माधुरी अरूणराव दाढे | १०१६ + ७८० |
| ११ | मालमत्तेच्या गुन्हयांचा तपास व वाहतुक अपघात प्रकरणे | २८.०५.१८-०२.०६.१८ | मपोशि/४५४, योगिता गणेशराव शिवाते | १०८१ + ७८० |
| १२ | वॉचर्स डयुटी प्रशिक्षण | १२.०६.१८-१४.०६.१८ | मपोना/३१९, रंजना श्रीराम सोयाम | ९२५ |
| १३ | एनडीपीएस अॅक्ट दाखल गुन्हयाचा तपास | ०५.०८.१८-१३.०८.१८ | पोना/२००७,नितीन अजाबराव कोवे | ९१२ + ७८० |
| १४ | इंटेलिजन्स कलेक्शन टेक्निक्स | ०३.०९.१८-०७.०९.१८ | मपोशि/१११८, मंजुळा रामन्ना पवार | १३९५ |
| | एकुण | | | २६,६२१ |

(कृपया मागे पहावे)

सदरचा खर्च २०५५ पोलीस १०९ जिल्हा पोलीस दल (००)(०१) जिल्हा पोलीस दल २८ व्यावसायीक व विशेष सेवा प्रदाने या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ करीता मंजुर अनुदानातुन भागविण्यात येत आहे.

**सहपत्र - प्रशिक्षण खर्च पावतीच्या मुळ प्रती.**

**( एम राज कुमार )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

---

क्रमांक :डीपी/३१-बी/अपील आदेश /पोनि संजय डहाके / 14239/२०१८ यवतमाळ दिांक

1 NOV 2018

**संदर्भ :-** क्रमांक.म.शा.पीडीई १०१८/प्रक्र २११/पोल -६ अ दि.०४/ १०/२०१८

**विषय :- अपील आदेश**
**पोनि संजय डहाके, नेम. पोलीस नियंत्रण कक्ष, यवतमाळ.**

**ooo**

पोनि संजय डहाके,. नेमणुक पो.नियंत्रण कक्ष यांनी शासनास केलेल्या अपील अर्जाचे अनुशंगाने माननिय राज्यमंत्री गृह ग्रामिण यांचे उपरोक्त संदर्भान्वये आदेश प्राप्त आहेत. सदरचे आदेशाची मुळ प्रत स्वतः स्विकारुन दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी करुन ती प्रत इकडील कार्यालयास परत करावी.

सहपत्र :- आदेश प्रत

**अनिलसिंह गौतम**
**प्र. पोलीस उपअधिक्षक,(मुख्या)**
**यवतमाळ.**

**राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**

**क्रमांक :- पीडीई १०१८/प्र.क्र.२११/पोल-६अ**

श्री.संजय डहाके, पोलीस निरीक्षक, यवतमाळ ..... वादी

**विरुध्द**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई ..... प्रतिवादी

**मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपीले) नियम, १९५६ मधील तरतूदी अन्वये दाखल केलेल्या फेरअपिल अर्जावर सुनावणी**

श्री.संजय डहाके, पोलीस निरीक्षक, यवतमाळ हे कारंजा पोलीस स्टेशन, जि.वर्धा येथे कार्यरत असताना त्यांनी केलेल्या कसुरीबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि. ३१/०५/२०१८ च्या आदेशान्वये **"एक वर्षाकरीता पदावनत (Reduction in Rank for 1 Year)"** ही शिक्षा दिलेली आहे. सदर शिक्षेविरुध्द श्री. डहाके यांनी शासनाकडे दिनांक ११/०६/२०१८ अन्वये अपील अर्ज दाखल केला असता त्यावर दिनांक २०/०६/२०१८ रोजी माझ्यासमोर सुनावणी झाली असता पोलीस महासंचाकलक यांनी दिलेल्या शिक्षेस दिनांक २८/०६/२०१८ च्या आदेशान्वये "पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती" देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने प्रस्तुत अपील अर्जावर दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी माझ्यासमोर सुनावणी झाली. सदर सुनावणीस श्री. डहाके तसेच गृह विभाग, मंत्रालय व क्षेत्रीय कार्यालयातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**वादी यांच्यावरील थोडक्यात दोषारोप** :- आपण पोलीस स्टेशन कारंजा, जिल्हा वर्धा येथे नेमणुकीस असतांना दिनांक २३/४/२०१८ रोजी पोउपनि/ मेश्राम व स्टाफनी महेंद्र मॅक्स गाडी क्रं. एम.एच. २६ एल ००७८ या गाडीमध्ये २५ पेटया देशी दारु व १ पेटी बियर सह वाहतूक करतांना पकडुन पो.स्टे. ला आणून कार्यवाही करीत असतांना अवैध दारू विक्रेता धनराज कळंबे, गौरी अग्रवाल, मस्के असे गैरकायदयाची मंडळी एकित्रत करून १०-१५ लोकांसह पो.स्टे. ला येवून, त्यांनी पोलीसांना अश्लील शिवीगाळ व धमकी दिली, ही बाब आपणांस माहित असतांना आपण त्यांचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही केली नाही. तसेच सदर मॅक्स गाडी कर्मचा-यांने दारुबंदी कायदयाखाली ताब्यात घेतल्यानंतर आपण त्या कर्मचा-यांना प्रोत्साहीत करण्याऐवजी, "तुम्हाला दारु पकडण्यास कोणी सांगीतले असे बोलून त्या कर्मचा-यांना अपमानीत करुन त्यांचे मनोबल खच्ची करुन ठाणेदार पदास अशोभनिय कृत्य केले आहे. त्याचप्रमाणे १०-१५ गैरकायदयाची मंडळी जमवुन पोलीस स्टेशनला येवून कर्मचा-यांना शिवीगाळ व धमकी देवून गोंधळ घालून पोलीसांच्या ताब्यात असलेली मॅक्स गाडी व त्यातील दारु व बियर सह पोलीसांच्या ताब्यातुन घेवून गेले. या प्रकरणाची नोंद घेणे व त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करणे गरजेचे असतानासुध्दा आपण तशी कार्यवाही न करुन दारुचा धंदा करणा-या इसमांना बेकायदेशीर सहकार्य करुन त्यांना गुन्हयातुन वाचविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**वादी यांचे म्हणणे** :- महोदय, माझ्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपाच्या अनुषंगाने विभागीय चौकशी करण्यासाठी उप विभागीय पोलीस अधिकारी, पुलगांव यांची नियुक्ती केली होती. या विभागीय चौकशीमध्ये मा. चौकशी अधिकारी यांनी समारोप अहवालात अंशत: दोषसिध्दी व दोषसिध्दी या बाबत काढलेले निष्कर्ष हे पुराव्यावर काढलेले नसुन ते संभाव्यतेवर व तर्कावर आधारित आहेत. त्यामुळे तर्कावर आधारलेला अहवाल हा न्याय संगत नाही. दोषारोप अंशत: सिध्द होणे हा शब्द विभागीय चौकशीमध्ये कुठेही नमुद नाही. महोदय मी कोणत्याही प्रकारची दारु सोडण्यास सांगितलेली नाही. केवळ वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातम्यांचा आधार घेऊन माझ्याविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे. महोदय माझी पोलीस विभागात प्रदिर्घ सेवा झाली असून मला अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची मोठी शिक्षा झालेली नाही. विभागीय चौकशीत सिध्द न झालेल्या दोषारोपांबाबत १ वर्ष पदानवतीची शिक्षा देणे ही गंभीर शिक्षा आहे. तरी मला देण्यात आलेली शिक्षा रद्द करण्यात यावी, अशी नम्र विनंती आहे.

**प्रतिवादी यांचे म्हणणे** :- वादी यांना देण्यात आलेली शिक्षा कसुरीच्या मानाने योग्य असून त्यांचा अपील अर्ज फेटाळण्यात यावा.

**निष्कर्ष** : वादी श्री.संजय डहाके, पोलीस निरीक्षक, यवतमाळ तसेच उपस्थित अधिकारी यांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. तसेच उपलब्ध असलेली कागदपत्रे तपासण्यात आली. वादी यांच्यावर विभागीय चौकशीमध्ये निर्विवादपणे आरोप सिध्द झाल्याचे दिसून येत नाही. वादींची आतापर्यंत झालेली सेवा लक्षात घेता कसुरीच्या मानाने त्यांना देण्यात आलेली शिक्षा कठोर असल्याचे दिसून येत आहे. याबाबीचा विचार करता या अपील अर्ज प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## निर्णय

१. वादी श्री.संजय डहाके, पोलीस निरीक्षक, यवतमाळ यांचा अपील अर्ज दाखल करुन घेण्यात येत आहे .

२. वादी श्री.संजय डहाके, पोलीस निरीक्षक, यवतमाळ यांना देण्यात आलेली "**एक वर्षाकरीता पदावनत (Reduction in Rank for 1 Year)**" ही शिक्षा रद्द करुन त्याऐवजी "**सक्त ताकीद**" ही शिक्षा देण्यात येत आहे .

३. वरील निर्णयाप्रमाणे संबंधितानी आवश्यक ती कार्यवाही करावी .

दिनांक :- 03/10/2018

ठिकाण :- मुंबई

(दिपक केसरकर)
राज्यमंत्री,गृह (ग्रामीण)

—— समाप्त ——